जा.क्र.प्राकृसंकें/वनस्पतीशास्त्र वि./१९९७ /२०२२
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.
दिनांक 16 SEP 2022

प्रति,

**मा. संचालक,**
विस्तार शिक्षण संचालनालय,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली. जि. रत्नागिरी.

**विषय : विद्यापीठ संकेतस्थळावर दरपत्रक प्रसिध्दी देणेबाबत....**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथे कंत्राटी मजूर पुरवठा करणेसाठी विविध ठेकेदारांकडून दरपत्रक मागविण्यासाठी सोबत जोडण्यात आलेले निविदा सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे, हि विनंती. सदर बाब आपल्या माहितीसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,

(शि.बा.भगत)
सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत. जि. रायगड.

**सोबत**: वरिलप्रमाणे.

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड

जा.क्र.कृसंके/ठेका /१९९७/२०२२ दिनांक – १६/०९/२०२२

## निविदा सुचना (Tender Notice)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र कर्जत येथील प्रक्षेत्रावर तसेच प्रयोगशाळेत अखिल भारतीय भात प्रकल्पातील वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ व पी.एच.डी. विद्यार्थी यांच्याकडून घेण्यात येणारे प्रयोगा यांची निरीक्षणे नोदवण्यासाठी कंत्राटी मजुर नेमण्याकरीता निविदा मागविण्या करीता. इच्छुक ठेकेदारांनी **मा. भात भात पैदास विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,** कर्जत, रायगड यांचे नावे आपले दरपत्रक सिलबंद लखोटयातून **दिनांक ३०.०९.२०२२** रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावे.

**अ) अखिल भारतीय भात प्रकल्पातील वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या कामसंबंधीची माहिती**

| अ. क्र | प्रयोगाचे नाव | कामे | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | Silicon solubilzor या खताचे भात पिकाच्या वाढीवरील परिणाम अभ्यासणे.<br>एकूण जाती – ०९<br>संस्करण – ४<br>रिप्लीकेशन – ३ | **१.फुटवे अवस्था:**<br>➤ Leaf Area index काढणे<br>➤ पाच रोपाचे पानातील वजन (Leaf weight)<br>➤ पाच खोडाचे वजन (Culm weight)<br>➤ वनस्पतीचा एकूण शुष्क भाग (TDM)<br>**२.लोंबीत येण्याची अवस्था:**<br>➤ Leaf Area index काढणे<br>➤ पाच रोपाचे पानातील वजन (Leaf weight)<br>➤ पाच खोडाचे वजन (Culm weight)<br>➤ वनस्पतीचा एकूण शुष्क भाग (TDM)<br>➤ सिलीकॉन सुक्ष्म अन्नद्रव्याचे पृथ्थकरण करण्यासाठी सेल सॅप काढून घेणे. | ०१/१०/२०२२ ते ३१/१०/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. फुलोऱ्याचे अवस्था:<br>➢ Leaf Area index काढणे<br>➢ पाच रोपाचे पानातील वजन (Leaf weight)<br>➢ पाच खोडाचे वजन (Culm weight)<br>➢ वनस्पतीचा एकूण शुष्क भाग (TDM)<br>➢ पाच रोपांची उंची (cm) व एकूण फुटवे मोजणे.<br>➢ सिलीकॉन सुक्ष्म अन्नद्रव्याचे पृथ्थकरण करण्यासाठी सेल सॅप काढून घेणे.<br>४. भात पक्व अवस्था:<br>➢ खोडाचे वनज<br>➢ १ वर्ग मिटर झाडाचे वजन घेणे<br>➢ पाच रोपांच्या दाणे व पंळीज मोजणे<br>➢ एक वर्ग मिटरवर एकूण दाणे मोजणे<br>➢ एक हजार दाणांचे वजन घेण<br>➢ रोपाचे शुष्क वजन घेणे<br>➢ भात बियाण्याच्या लोंब्या काढण्यास मदत करणे भात कापणी झोडणी, मळणी, भात पेंढा व भात वाळवणे व वजन घेण्यास मदत करणे. | ०१/११/२०२२ ते ३०/११/२०२२ |
| २ | कमी सुर्यप्रकाशात भात पिकांच्या वाढीवर परीणाम अभ्यासणे (Low light stress)<br>एकूण जाती — २१<br>संस्करण — २<br>रिप्लीकेशन — ३ | १.फुटवे अवस्था:<br>पानातील हरितद्रव्य काढणे (chlorophyll content).<br>२.फुलोरा अवस्था:<br>पाच रोपाची उंची, पानाचे वजन, खोडाचे वजन, लोंब्याचे वजन, एकूण शुष्क भार घेणे.<br>४. भात पक्व अवस्था:<br>प्रति लोंबी दाण्याची व पंळीजची संख्या, खोडाचे वजन, लोंबीचे वजन, एकूण शुष्क भार (Total Dry matter) एक हजार दाण्याचे वजन इ. | ०१/१२/२०२२ ते ३१/१२/२०२२ |
| ३ | संस्करण — क्षार क्षमता तपासणे (Salinity stress) पाण्याचे ताण देणे (Drought stress) पाण्यात बुडलेल्या | ➢ मुळाची व खोडाची लांबी मोजणे.<br>➢ मुळाचे व खोडाचे कोरडे वजन घेणे.<br>➢ हरितद्रव्याचे प्रमाण तपासणे. | ०१/१०/२०२२ ते |

| | | | |
|---|---|---|---|
| | रोपांची क्षमता तपासणे (Submorgence)<br>एकूण जाती — २०<br>संस्करण — ४<br>रिप्लीकेशन — ३ | ➢ मुळ व खोडातील सोडीअम व पोटॅशिअमचे प्रमाण तपासणे | ३१/१०/२०२२ |
| ४ | सिलीकॉन या प्रयोगातून मिळालेल्या निरिक्षणांची नोंदणी संगणकामध्ये करून त्याचे पृथ्थकरण करणे. तसेच संस्कारनिहाय पळींज व भरलेल्या दाण्यांचे मोजणी करणे. | | ०१.०३.२०२३ ते |
| ५ | कमी सुर्यप्रकाशात तग धरणाऱ्या जातींच्या प्रयोगातून मिळालेल्या निरिक्षणांची नोंदणी संगणकामध्ये करून त्याचे पृथ्थकरण करणे. | | ३१.०३.२०२३ |
| ६ | Multiple abiotic Stresses या प्रयोगातून आलेल्या निरीक्षणांची नोंदणी संगणकामध्ये करणे तसेच त्यापासुन आलेल्या डेटाचे पृथ्थकरण करणे. | | |

ब) पीएच. डी विद्यार्थी (कृषि वनस्पतीशास्त्र विभाग कृ. म. वि. दापोली)

| अ. क्र. | प्रायोगिक कामाची यादी | कालावधी |
|---|---|---|
| १ | बियाण्याचे नमुने (रब्बी २०२१–२२) साफ करून Huller मशीनवर साल काढण्यास मदत करणे साल काढणीनंतर नमुने साफ करून मशीनवर पांढरा तांदुळ तयार करण्यास मदत करणे, पांढऱ्या तांदळापासून पावडर तयार करणे. | ०१.०३.२०२३ ते ३१.०३.२०२३ |
| २ | पावडर तयार करण्यात आलेल्या तांदुळातून अमायलूज काढण्यासाठी मदतनीस घेवून प्रयोगशाळेतील वापरण्यात आलेले ग्लासवेअर स्वच्छ धुवूण घेणे. | |
| ३ | तयार करण्यात आलेल्या पावडर पासून झिंक व लोहाचे पृथ्थकरण करण्यासाठी डायअॅसीडसाठी सॅम्पल तयार करून घेणे. | |

जा.क्र.प्रासंके/कंत्राटी कामे/१९९७/२०२२
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड.
पिन कोड — ४१० २०१
दिनांक — १६.०९.२०२२

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत जि. रायगड.

प्रत — प्रसिध्दीसाठी रवाना —
१. कार्यालय नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत (रायगड).
२. विद्यापिठ वेबसाईट- www.dbskkv.org

## ठेका पध्दतीने कामे करणे संबंधिच्या या कार्यालयाच्या अटी/शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबंधीत कामगारांच्या बॅंक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१(ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील

१३. कामाची वेळ सकाळी ९.०० ते १.३० आणि दुपारी २.०० ते ५.३० अशी राहील.ज्या दिवशी ठेकेदार गैरहजर राहणार त्यावेळी पुर्व सूचना देणे बंधनकारक राहील.

१४. प्रक्षेत्रावरील कामे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुचनेनुसार करावयाची आहेत.

१५. कामाची गरज संपल्यावर कोणत्याही प्रकारची लेखी पूर्वसूचना न देता ठेका पध्दत रद्द केली जाईल.

१६. प्रक्षेत्रावर काम करत असताना कोणत्याही कारणाने व कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सदरील अपघातास हे केंद्र जबाबदार राहणार नाही.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत जि. रायगड.